मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी

# युवक आधार

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

■ वर्ष : ३ ■ अंक : ३२२ ■ बुधवार, ०५ ऑगस्ट २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514







# पनवेलमध्ये 'भोसले वडेवाले'च्या नव्या शाखेचे उद्घाटन

## अभिनेत्री धनश्री काडगावकर यांच्या शुभहस्ते शाखेचे उद्घाटन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, प्रतिनिधी :** अस्सल चवीसाठी प्रसिद्ध असलेल्या 'भोसले वडेवाले' या ब्रँडच्या नव्या शाखेचे भव्य उद्धाटन रविवार, दिनांक २ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ७.०० वाजता पनवेल येथे संपन्न झाले. खांदा कॉलनी, पनवेल येथे सुरू झालेल्या या नव्या शाखेच्या उद्धाटन सोहळयाला राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी परिसरातील नागरिकांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला.




सन २०१२ पासून आपल्या दर्जेदार चवीमुळे आणि ग्राहकांच्या विश्वासामुळे लोकप्रिय ठरलेल्या भोसले वडेवाले या ब्रँडने आता पनवेलमध्ये आणखी एक नवी शाखा सुरू करून खाद्यप्रेमींसाठी आनंदाची बातमी दिली आहे. "खमंग भोसले वड्याचा, अस्सल परंपरेचा..." हा दर्जा कायम ठेवत ग्राहकांना उत्तम सेवा देण्याचा संस्थेचा मानस असल्याचे दीपक कलोते यांनी यावेळी सांगितले.

या उद्धाटन सोहळयाला प्रमुख पाहुणे म्हणून भोसले वडेवाले संस्थापक प्रशांत भालेराव, नगरसेवक प्रकाश बिनेदार, बदलापूर नगरसेवक राजेंद्र धुळे , नगरसेवक एकनाथ दादा गायकवाड , माजी सरपंच वाजे बबन पाटील , सामाजिक कार्यकर्ते नरेश पाटील , उरण नगरसेवक मंगेश कासारे, डोंबिवली उपशहर प्रमुख प्रमोद कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते.तसेच लोकप्रिय मराठी अभिनेत्री धनश्री काडगावकर या विशेष आकर्षण म्हणून कार्यक्रमाला उपस्थित होत्या. अभिनेत्री धनश्री काडगावकर यांच्या शुभहस्ते या शाखेचे उद्धाटन करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन दीपक अनंता कलोते, दर्पण नामदेव भालेराव आणि रोशन गणेश जाधव आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केले होते.भोसले वडेवालेच्या नव्या शाखेमुळे पनवेल परिसरातील ग्राहकांना अस्सल चवीचा आनंद अधिक सहज उपलब्ध होणार असून हा उद्धाटन सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

# महागाव तालुक्यात अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ मदत द्या

## काँग्रेसचे तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे महागाव,:यवतमाळ :** महागाव तालुक्यात २९ व ३० जुलै २०२६ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, बाधित शेतकऱ्यांचे तात्काळ पंचनामे करून शासनाच्या नियमानुसार आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी करणारे निवेदन आज महागाव तालुका काँग्रेस कमिटी, शहर काँग्रेस कमिटी व युवक काँग्रेस कमिटीच्या वतीने तहसीलदार, महागाव यांच्या मार्फत महाराष्ट्राचे मा. मुख्यमंत्री यांना सादर करण्यात आले.या निवेदनाचे नेतृत्व महागाव तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री. सुनील बाबूसिंग राठोड व शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष तथा नगरसेवक शैलेश कोपरकर यांनी केले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, २९ व ३० जुलै रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे तालुक्यातील अनेक गावांतील शेतकऱ्यांच्या शेतातील उभी पिके पाण्याखाली गेली आहेत. विशेषतः कापूस, सोयाबीन, तूर व इतर खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, अनेक शेतकऱ्यांवर आर्थिक संकट कोसळले आहे.शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने खरीप हंगामाची पेरणी केली होती. मात्र अवकाळी व अतिवृष्टीमुळे त्यांच्या मेहनतीवर पाणी फेरले गेले आहे. अशा परिस्थितीत शासनाने कोणताही विलंब न लावता महसूल व कृषी विभागाच्या माध्यमातून नुकसानग्रस्त क्षेत्राचे तात्काळ पंचनामे करून बाधित शेतकऱ्यांना शासनाच्या नियमानुसार आर्थिक मदत, नुकसानभरपाई व आवश्यक सवलती जाहीर कराव्यात, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.तसेच नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांवर ओढवलेल्या या संकटाकडे शासनाने अत्यंत संवेदनशीलतेने



पाहण्याची गरज असून, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा मिळावा यासाठी तातडीने कार्यवाही करण्यात यावी, अशीही आग्रही मागणी करण्यात आली आहे.

यावेळी तहसील कार्यालयात मोठ्या संख्येने काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते व शेतकरी महीला उपस्थित होते. निवेदन स्वीकारल्यानंतर संबंधित मागण्या शासनाकडे पाठविण्याची प्रक्रिया करण्यात आली.या प्रसंगी सुनील राठोड, शैलेश दिलीपराव कोपरकर, जिल्हा काँग्रेस कमिटी उपाध्यक्ष शिवाजीराव देशमुख , महेंद्र कांबळे, इमरान पठाण, नितीन नरवाडे , काँग्रेस नेते अतुल शिंदे , सुनिल भवानकर , विठ्ठलराव पवार, तेजस नरवाडे , चंदाताई रमेश भांगे , सुनिता चंद्रवंशी , जयश्री नरवाडे यांच्यासह शहरातील महिला आवर्जून उपस्थित होत्या . महागाव तालुका काँग्रेस कमिटी, शहर काँग्रेस कमिटी, युवक काँग्रेस कमिटीचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच विविध गावांतील शेतकरी मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.यावेळी उपस्थितांनी शासनाने केवळ पंचनाम्यांची औपचारिकता न करता नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यात तातडीने आर्थिक मदत जमा करावी, अन्यथा काँग्रेस पक्षाच्या वतीने तीव्र लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्याचा इशाराही दिला. उपस्थित शेतकऱ्यांनी शासनाने तात्काळ निर्णय घेऊन संकटग्रस्त शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी एकमुखी मागणी केली.




# सर्वात मोठ्या दिवाळी अंक स्पर्धेचा निकाल जाहीर

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रात गेल्या ३० वर्षांहून अधिक काळापासून उल्लेखनीय कार्य करणाऱ्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मुंबई मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या आणि सर्वाधिक रक्कमेचे पारितोषिक असलेल्या राज्यस्तरीय व रायगड जिल्हास्तरीय दिवाळी अंक स्पर्धा २०२५ च्या अर्थात रौप्य महोत्सवी वर्षाचा निकाल आज (दि. ०४ ऑगस्ट) जाहीर करण्यात आला आहे.

राज्यभरातील दिवाळी अंकांना प्रोत्साहन देणाऱ्या या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत साहित्य, पत्रकारिता, सामाजिक आशय, कलात्मकता आणि सर्जनशीलतेचा उत्कृष्ट आविष्कार करणाऱ्या अंकांचा आणि साहित्यिकांचा गौरव करण्यात आला आहे. या स्पर्धेचा निकाल श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी मुंबई येथे मुंबई मराठी पत्रकार संघाच्या सभागृहात पत्रकार परिषेदच्या माध्यमातून जाहीर केला. तसेच यंदाच्या वर्षापासून डिजिटल दिवाळी अंकाचा पारितोषिकांमध्ये समावेश करून प्रथम क्रमांकास १५ हजार रुपये, द्वितीय क्रमांकाला १० तर तृतीय क्रमांकाच्या डिजिटल अंकाला ०५ हजार रुपयांचे बक्षिस देणार असल्याची घोषणाही त्यांनी केली. यावेळी मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण, उपाध्यक्ष शैलेंद्र शिर्के यांच्यासह पदाधिकारी, पत्रकार उपस्थित होते.




राज्यस्तरीय स्पर्धेत 'दीपावली' या दिवाळी अंकाने प्रथम क्रमांक पटकावत १ लाख रुपयांचे प्रथम पारितोषिक मिळविले आहे. या अंकाचे संपादक अशोक कोठावळे आहेत. 'मुक्त संवाद' या अंकाने द्वितीय क्रमांक मिळवित ५० हजार रुपयांचे पारितोषिक पटकावले असून, या अंकाचे संपादक विवेक कोरडे आहेत. तृतीय क्रमांक विभागून देण्यात आला असून 'वसा' या अंकाचे संपादक सई पवार आणि 'अक्षरलिपी' या अंकाच्या संपादिका सौ. शर्मिष्ठा भोसले यांना संयुक्तपणे ३० हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात आले आहे.राज्यस्तरीय स्पर्धेत विविध साहित्यिक आणि कलात्मक विभागांमध्येही उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अंकांचा आणि लेखकांचा गौरव करण्यात आला आहे. 'बाईमाणूस' या अंकाला लक्षवेधी उत्कृष्ट अंकाचा पुरस्कार मिळाला असून, त्याचे संपादक प्रशांत पवार यांना १५ हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात आले आहे. 'धनंजय' अंकातील 'आवाज' या कथेसाठी लेखिका मनस्विनी लता रविंद्र यांना उत्कृष्ट कथा पुरस्कार ७ हजार रुपये, तर 'ललित' अंकातील 'टॉलस्टॉयची सायकल' या लेखासाठी लेखक डॉ. नंदू मुलमुळे यांना उत्कृष्ट लेख पुरस्कार ५ हजार रुपये जाहीर करण्यात आला आहे. 'युगांतर' अंकातील 'त्याने तिरंगा पाहिला' या कवितेसाठी कवी सतीश लोले यांना उत्कृष्ट कविता पुरस्कार ५ हजार रुपये मिळणार आहेत. 'नवभारत' या अंकाला उत्कृष्ट विशेषांक पुरस्कार मिळाला असून, संपादक निरंजन हातेकर यांना १५ हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात आले आहे. बालसाहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानासाठी 'मुलांचे मासिक' या अंकाला उत्कृष्ट बाल दिवाळी अंकाचा पुरस्कार जाहीर झाला असून, संपादक जयंत मोडक यांना ७ हजार ५०० रुपयांचे पारितोषिक देण्यात येणार आहे. याशिवाय 'अक्षर' अंकातील 'युद्धकांड' या परिसंवादासाठी मीना कर्णिक आणि हेमंत कर्णिक यांना लक्षवेधी परिसंवाद पुरस्कार ५ हजार रुपये, तर 'शब्दांगण' अंकातील आसाराम लोमटे यांच्या मुलाखतीसाठी मुलाखतकार मनिषा उगले यांना लक्षवेधी मुलाखत पुरस्कार ५ हजार रुपये जाहीर करण्यात आला आहे. 'साप्ताहिक विवेक' या अंकाच्या मुखपृष्ठासाठी चित्रकार विनायक खरात यांना सर्वोत्कृष्ट मुखपृष्ठ पुरस्कार ५ हजार रुपये, तर सर्वोत्कृष्ट व्यंगचित्र पुरस्कार ज्ञानेश बेलेकर यांना ५ हजार रुपये देण्यात येणार आहेत.रायगड जिल्हास्तरीय स्पर्धेत 'इंद्रधनू' प्रथमरायगड जिल्ह्यातील दिवाळी अंकांना प्रोत्साहन देण्यासाठी घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय स्पर्धेतही विविध अंकांनी आपला ठसा उमटविला. या स्पर्धेत 'इंद्रधनू' या दिवाळी अंकाने प्रथम क्रमांक पटकावत ४० हजार रुपयांचे पारितोषिक मिळविले आहे. या अंकाचे संपादक विजय पवार आहेत. 'आगरी दर्पण' या अंकाने द्वितीय क्रमांक मिळवित २० हजार रुपयांचे पारितोषिक पटकावले असून, या अंकाचे संपादक दीपक राजाराम म्हात्रे आहेत. तर 'शब्दसंवाद' या अंकाने तृतीय क्रमांक मिळविला असून, या अंकासाठी १० हजार रुपयांचे पारितोषिक जाहीर करण्यात आले आहे. या अंकाचे संपादक विनोद बाबुराव साळवी आहेत.रायगड जिल्हास्तरीय स्पर्धेत 'रसायनी टाइम्स' या अंकाला उत्तेजनार्थ पुरस्कार जाहीर झाला असून, संपादक अनिल भोळे यांना ५ हजार रुपयांचे पारितोषिक मिळणार आहे. तसेच 'पनवेल टाइम्स' या अंकालाही उत्तेजनार्थ पुरस्कार मिळाला असून, संपादक गणेश कोळी यांना ५ हजार रुपयांचे पारितोषिक देण्यात येणार आहे. रायगड जिल्हास्तरीय स्पर्धेत विविध साहित्य प्रकारांमध्ये उत्कृष्ट लेखन करणाऱ्या साहित्यिकांचाही पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार आहे. 'आगरी दर्पण' अंकातील 'गॉटर' या कथेसाठी लेखक किरण शेले यांना उत्कृष्ट कथा पुरस्कार ३ हजार रुपये जाहीर करण्यात आला आहे. 'श्री समर्थ विचार' अंकातील 'ग्रामीण आरोग्य व्यवस्थेची दुर्दशा' या लेखासाठी लेखक अरविंद पाशिलकर यांना उत्कृष्ट लेख पुरस्कार ३ हजार रुपये, तर 'म्हसळा टाइम्स' अंकातील 'चाळ' या कवितेसाठी कवी दिलीपराव झुंजारराव यांना उत्कृष्ट कविता पुरस्कार ३ हजार रुपये जाहीर करण्यात आला आहे. दिवाळी अंकांना व्यासपीठ राज्यभरातून प्राप्त झालेल्या विविध दिवाळी अंकांचे परीक्षण साहित्यिक गुणवत्ता, आशय, विषयाची निवड, मांडणी, पत्रकारितेचा दर्जा, सामाजिक भान, कलात्मकता, सर्जनशीलता आणि वाचनीयता या विविध निकषांच्या आधारे करण्यात आले. त्यातून विविध विभागांतील विजेत्यांची निवड करण्यात आली. राज्य भरातून उदंड प्रतिसाद लाभलेल्या या स्पर्धेसाठी विणा सानेकर, रेखा देशपांडे आणि सुप्रसिद्ध सुलेखनकार सुनील धोपावकर यांनी परीक्षक तर समन्वयक म्हणून दीपक म्हात्रे व शैलेंद्र शिर्के यांनी जबाबदारी पार पाडली.

## राज्यस्तरीय स्पर्धेत 'दीपावली' प्रथम, 'मुक्त संवाद' द्वितीय; 'वसा' आणि 'अक्षरलिपी'ला विभागून तृतीय क्रमांक

## रायगड जिल्हास्तरीय स्पर्धेत 'इंद्रधनू' प्रथम, 'आगरी दर्पण' द्वितीय तर 'शब्दसंवाद' तृतीय

## यंदापासून डिजिटल अंकांलाही बक्षीस

> सातत्याने २५ वर्षे दिवाळी अंक स्पर्धेचा उपक्रम राबविला जात आहे, ही निश्चितच कौतुकास्पद बाब आहे. या उपक्रमासाठी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे मी मनःपूर्वक आभार व्यक्त करतो. दिवाळी अंकांसाठी एवढ्या मोठ्या रकमेची पारितोषिके देणारी अशी स्पर्धा देशात अन्यत्र कुठेही होत नाही.
>
> - संदीप चव्हाण, अध्यक्ष- मुंबई मराठी पत्रकार संघ

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधताना म्हंटले कि, मराठी संस्कृतीमध्ये दिवाळी अंकांना मोठी आणि समृद्ध परंपरा आहे. साहित्य, पत्रकारिता, कला, सामाजिक प्रश्न, संस्कृती, इतिहास, व्यक्तिचित्रण, कथा, कविता, वैचारिक लेखन आणि विविध विषयांना दिवाळी अंकांच्या माध्यमातून व्यापक व्यासपीठ मिळते. बदलत्या काळातही ही परंपरा अधिक समृद्ध व्हावी आणि नव्या पिढीतील लेखक, पत्रकार, साहित्यिक व कलावंतांना प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक वर्षांपासून श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मुंबई मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने दिवाळी अंक स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. यंदाचे हे रौप्य महोत्सवी वर्ष असल्याने स्पर्धेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. महाराष्ट्राच्या विविध भागांतून आलेल्या दिवाळी अंकांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवून मराठी साहित्य आणि पत्रकारितेची समृद्ध परंपरा जपण्याचे काम केले. दिवाळी अंकांच्या माध्यमातून दर्जेदार साहित्याला चालना मिळावी, समाजातील विविध प्रश्नांवर वैचारिक चर्चा व्हावी, नवोदित लेखकांना संधी मिळावी आणि मराठी भाषा-साहित्याची परंपरा अधिक व्यापक व्हावी, यासाठी या स्पर्धेचे योगदान महत्त्वपूर्ण ठरत आहे असे सांगून राज्यस्तरीय तसेच रायगड जिल्हास्तरीय विजेत्यांचे अभिनंदन करून भविष्यातही अधिकाधिक दर्जेदार दिवाळी अंक प्रकाशित व्हावेत, अशी अपेक्षा आमदार प्रशांत ठाकूर यांनी यावेळी व्यक्त केली. तसेच लवकरच पारितोषिक वितरण सोहळा मुंबईत होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# बॅलेट पेपरद्वारे वंचित बहुजन आघाडीची प्रदेश कार्यकारिणी निवड; राजेंद्र पातोडे प्रदेशाध्यक्षपदी, नव्या नेतृत्वाकडे राज्याचे लक्ष

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी:-प्रकाश गवारे :** वंचित बहुजन आघाडीच्या प्रदेश कार्यकारिणीची निवड लोकशाही पद्धतीने बॅलेट पेपरद्वारे पार पडली असून, पक्षाच्या कार्यकर्ते व सदस्यांनी मतदानातून नवीन नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला आहे. या निवडणुकीत राजेंद्र पातोडे यांची प्रदेशाध्यक्षपदी निवड झाली असून, नव्या प्रदेश कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली आहे. या निवडीमुळे पक्षाच्या राज्यभरातील संघटनात्मक बांधणीला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा कार्यकर्त्यांकडून व्यक्त होत आहे.




वंचित बहुजन आघाडीने अंतर्गत संघटनात्मक निवडणुकीत लोकशाही प्रक्रियेला प्राधान्य देत बॅलेट पेपरच्या माध्यमातून मतदान घेतले. पक्षाच्या कार्यकर्त्यांनी व सदस्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपले प्रतिनिधी निवडले. पक्षाच्या अंतर्गत लोकशाहीला बळकटी देणारी ही प्रक्रिया असल्याची भावना अनेक कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.

नवनिर्वाचित प्रदेशाध्यक्ष म्हणून राजेंद्र पातोडे यांच्यावर राज्यातील पक्ष संघटना अधिक मजबूत करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यांच्यासोबत प्रदेश कार्यकारिणीवर सुजात आंबेडकर, अरुण जाधव, इंजि. प्रशांत इंगोले, जितरत्न पटाईत, डॉ. चित्रा कुऱ्हे, दिपक डोके, नागोराव पांचाळ, सर्वजित बनसोडे, कृष्णा देशमुख, सारंग थोरात, ज्ञानेश्वर कवठेकर आणि उत्तम वनशिव यांची सदस्य म्हणून निवड झाली आहे.

नवनिर्वाचित प्रदेश कार्यकारिणी राज्यभर पक्षाची संघटनात्मक उभारणी, सामाजिक न्याय, संविधानिक मूल्यांचा प्रचार-प्रसार आणि बहुजन समाजाच्या विविध प्रश्नांवर प्रभावीपणे काम करेल, अशी अपेक्षा कार्यकर्त्यांनी व्यक्त केली आहे. नव्या नेतृत्वामुळे पक्षाच्या आगामी राजकीय वाटचालीला अधिक बळ मिळेल, असा विश्वासही व्यक्त होत आहे.

राज्याच्या विविध भागांतून नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, सामाजिक, राजकीय आणि आंबेडकरी चळवळीतील अनेक कार्यकर्त्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. नव्या प्रदेश कार्यकारिणीने पक्षाची विचारधारा अधिक प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचवून संघटन अधिक मजबूत करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.लोकशाही प्रक्रियेतून निवडून आलेल्या या प्रदेश कार्यकारिणीच्या माध्यमातून वंचित बहुजन आघाडी राज्यातील राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात अधिक प्रभावी भूमिका बजावेल, अशी आशा पक्षाच्या कार्यकर्त्यांकडून व्यक्त केली जात आहे.

# आदर्श शिक्षक कै. विनोद कळंबे सर यांची जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**जाफराबाद टेंभुर्णी प्रतिनिधी अनिल ससाने :** आदर्श शिक्षक कै. विनोद कळंबे सर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पत्नी शिक्षिका छाया विनोद कळंबे यांनी सामाजिक बांधिलकी जपत भातोडी जिल्हा परिषद शाळेला साऊंड सिस्टम सप्रेम भेट दिली.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भातोडी ता. जाफराबाद जि. जालना येथे कै.विनोद कळंबे सर यांची जयंती उत्सव साजरी करण्यात आली पत्नी शिक्षका छाया विनोद कळंबे यांनी सामाजिक बांधिलकी जपत भातोडी जिल्हा परिषद शाळेत साऊंड सिस्टम भेट दिली शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याच्या स्मृती जपण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सांस्कृतिक व विविध उपक्रमांसाठी या साऊंड सिस्टमचा उपयोग होईल

यावेळी कार्यक्रमास उपस्थित शिक्षक वृंदामध्ये गोविंद जाधव सर, सोपान शिंदे सर, खाडेभराड सर, खराडे मॅडम, चेके मॅडम, अरुण भोरे, समाधान चव्हाण, भगवान उगले, अमोल उगले, संतोष उगले, अरुण उगले, संतोष लोखंडे, दत्तात्रय चव्हाण, अनिल उगले, रामा शेळके, सुभाष उगले, राजू गावंडे, सुदर्शन उगले, भागवत उगले, रामेश्वर उगले, सुखदेव उगले, संदीप उगले आदी मान्यवर उपस्थित होते.




मनोगत सोपान शिंदे सर यांनी मांडले. सूत्रसंचालन मधुकर गोफणे सर यांनी केले तर आभार प्रदर्शन खाडेभराड सर यांनी केले.

कार्यक्रमात उपस्थितांनी कै. विनोद कळंबे सर यांच्या कार्याचे स्मरण करून त्यांना आदरांजली वाहिली. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ करण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्व उपस्थितांकडून मनःपूर्वक कौतुक करण्यात आले.

# आ. प्रकाश भारसाकळे यांच्या वाढदिवसानिमित्त अकोट येथे मोफत आरोग्य शिबीर उत्साहात संपन्न !!

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे अकोट:** भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा आमदार प्रकाश पाटील भारसाकळे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून श्री गजानन महाराज मंदिर गजानन नगर आकोट येथे अकोट शहर व ग्रामीण भारतीय जनता पक्षाच्या वतीने भव्य मोफत आरोग्य तपासणी व ईसीजी (ECG) शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला अकोट शहर व परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या आरोग्य शिबिरामध्ये नागरिकांची तज्ज्ञ डॉक्टरांकडून सामान्य वैद्यकीय तपासणी करण्यात आली. यासोबतच हृदयविकाराच्या निदानासाठी अत्यंत महत्त्वाची असणारी ईसीजी (ECG) तपासणी आणि रक्ताशी संबंधित सीबीसी (CBC), हिमोग्लोबिन, एलएफटी (LFT), केएफटी (KFT), लिपिड प्रोफाइल, रक्तातील साखर (Blood Sugar), सिरम कॅल्शियम (Serum Calcium) व युरिक ॲसिड (Uric Acid) यांसारख्या विविध महत्त्वाच्या तपासण्या मोफत करण्यात



आल्या.याप्रसंगी अकोटच्या नगराध्यक्ष सौ. माया धुळे, उपनगराध्यक्ष प्रथमेश बोरोडे, भाजपा जिल्हा सरचिटणीस राजूभाऊ नागमते, माजी नगराध्यक्ष पुरुषोत्तम चौखंडे, आरोग्य सभापती मनीष कराळे, पाणीपुरवठा सभापती अमोल पालेकर, विधानसभा प्रमुख राजेश रावनकार, भाजपा तालुकाध्यक्ष गोपाल मोहोड, शहराध्यक्ष हरीश टावरी, गटनेते रवी ठाकूर, नगरसेविका सौ. शुभांगी टेमझरे, सौ. शारदा मिसळे, सौ. गंगाबाई चंदन, डॉ. ढोके, अमोल वानखडे, ग्रामीण सरचिटणीस गजानन अकोटकर, ग्रामीण उपाध्यक्ष ओम शेंडे यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे सर्व सभापती, नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदारांच्या वाढदिवसानिमित्त नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेत अशा प्रकारच्या समाजोपयोगी उपक्रमाचे आयोजन करणे ही अत्यंत कौतुकास्पद बाब असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. या शिबिराचा लाभ घेतलेल्या सर्व नागरिकांचे आयोजक प्रभाग क्र.७चे नगरसेवक आरोग्य सभापती मनीष रामाभाऊ कराळे, श्रीमती गंगाबाई चंदन, सौं शारदा मिसळे यांच्या वतीने मनापासून आभार मानण्यात आले.

# जि. प. शाळा चिकाळा येथे गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी; शिक्षकांचे गुरुपूजन व शिष्यवृत्तीप्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार

**दैनिक युवक आधार**

**मुदखेड | प्रतिनिधी योगेश चौदंते :** जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, चिकाळा येथे गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने गुरुपूजन तसेच शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांच्या सत्काराचा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमात शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रविण देशमुख यांच्या हस्ते शाळेतील शिक्षिका सौ. कौसल्या कर्वे व सौ. सपना शिंदे यांचे गुरुपूजन करून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत शिक्षकांचे असलेले मोलाचे योगदान अधोरेखित करत त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात



आला.

यावेळी शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून शाळेचा नावलौकिक वाढविणाऱ्या गणराज राम भोसले या विद्यार्थ्याचा शालेय व्यवस्थापन समितीच्या वतीने शाल, पुष्पहार व सन्मानचिन्ह देऊन विशेष सत्कार करण्यात आला. उपस्थितांनी त्याचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमास शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रविण इंगोले, माजी सरपंच गंगाधर पांचाळ, माजी ग्रामपंचायत सदस्य प्रकाश गायकवाड, माजी उपसरपंच झ्. प्रकाश इंगोले, शाळेतील शिक्षक, विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात पार पडला.

# गोंदिया शहरातील अनेक युवकांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड गोंदिया जिल्हा प्रतिनिधी** : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी जनसंपर्क कार्यालय, येथे गोंदिया शहरातील अनेक युवकांनी खासदार श्री राजेंद्र जैन यांच्या उपस्थितीत पक्ष प्रवेश केला.



खासदार श्री प्रफुल पटेलजी यांच्या विकासवादी नेतृत्वावर विश्वास ठेवून गोंदिया शहरातील सर्वश्री वैभव लदरे, सोमू लदरे, संस्कार लदरे, अंकित लदरे, जय महावत, रणजित बरिसाल, असुतोष व्यास, विवेक बिरिया, दुर्गेश चिंचखेडे, मनीष बोरकर, प्रांजल चुटेलकर, सागर जनेवार, ब्रिजेश बैरिसाल,पिंकी लदरे, अंश माहुरे, लकी हतकया, वेदांत लदरे, अभिषेक चिमोटे, विवेक डाखा, आदी शेंद्रे, अजय सोनी, शशिकांत बैरीशाल, रिषभ बैरीशाल, अंसू बिरिया, वैभव बिरिया, पपू दानवे, ओम छडीमलक, भोला राऊत, देवा कावडे, सागर चौहान, उमेश बोरकर, लिंगराज नागज्योती, यश बैरीशाल, आशु, समुद्रे, गणेश मारवाडे, अजय सोनी यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

यावेळी नगरसेवक श्री लोकेश यादव व उपस्थित होते. या प्रवेशामुळे गोंदिया शहरातील युवक राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष संघटनेला मजबूती मिळणार असून पक्षाची संघटन अधिक मजबूत होईल. खासदार श्री प्रफुल पटेलजी यांच्या नेतृत्वात व खासदार श्री राजेंद्र जैन यांच्या मार्गदर्शनात गोंदियाच्या विकास अधिक जलद गतीने होणार असा विश्वास सर्व युवकांनी त्यांनी व्यक्त केला.

# केनवडच्या हक्कावर घाला? अपर तहसील कार्यालयासाठी एल्गार; माजी आमदार विजयराव जाधव थेट आंदोलनाच्या मैदानात!

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : केनवड (रिसोड) केनवडसाठी शासनाने मंजूर केलेले अपर तहसील कार्यालय अन्यत्र हलविण्याच्या कथित हालचालींविरोधात केनवड महसूल मंडळातील नागरिकांचा संताप उफाळून आला असून, न्याय्य हक्कासाठी सुरू असलेल्या साखळी उपोषणाला आज माजी आमदार विजयराव जाधव यांनी प्रत्यक्ष भेट देत आंदोलनकर्त्यांशी सविस्तर संवाद साधला. त्यांच्या भेटीमुळे आंदोलनाला नवे बळ मिळाले असून, केनवडच्या जनतेचा लढा अधिक तीव्र होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

उपोषणस्थळी पोहोचल्यानंतर माजी आमदार विजयराव जाधव यांनी आंदोलनकर्त्यांच्या भावना, समस्या आणि मागण्या शांतपणे ऐकून घेतल्या. जनहिताचा विचार करून आंदोलनकर्त्यांनी साखळी उपोषण मागे घ्यावे, अशी त्यांनी विनंती केली.



मात्र, नागरिकांनी ठाम भूमिका घेत स्पष्ट शब्दांत सांगितले की, केनवडसाठी मंजूर झालेले अपर तहसील कार्यालय कोणत्याही परिस्थितीत अन्यत्र हलवू देणार नाही.

आंदोलनकर्त्यांनी माजी आमदार विजयराव जाधव यांच्यासमोर आपली भूमिका मांडताना सांगितले की, शासनाने केनवडसाठी मंजूर केलेले अपर तहसील कार्यालय दुसरीकडे हलविण्याचा प्रयत्न हा संपूर्ण केनवड महसूल मंडळातील नागरिकांवर अन्याय करणारा निर्णय ठरेल. हजारो नागरिकांना महसुली कामांसाठी दूरवर जावे लागेल, वेळ आणि पैशाचा अतिरिक्त भार सहन करावा लागेल. त्यामुळे मंजूर कार्यालय केनवड येथेच सुरू करणे हीच जनतेची एकमुखी मागणी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

> 'केनवडसाठी मंजूर झालेले अपर तहसील कार्यालय हा जनतेचा न्याय्य हक्क आहे. हा हक्क हिरावून घेण्याचा कोणताही प्रयत्न खपवून घेतला जाणार नाही. नागरिकांच्या मागण्या शासनापर्यंत ठामपणे पोहोचवून सकारात्मक निर्णयासाठी मी स्वतः पाठपुरावा करणार आहे.'
>
> _श्री.विजयरावजी जाधव माजी आमदार

यावेळी माजी आमदार विजयराव जाधव यांनी आंदोलनकर्त्यांच्या भावना समजून घेत त्यांच्या मागण्या योग्य असल्याचे सांगितले. संबंधित प्रशासन आणि शासन स्तरावर हा विषय गांभीर्याने मांडून न्याय मिळवून देण्यासाठी आपण सर्वतोपरी प्रयत्न करू, असे त्यांनी आश्वासन दिले. तसेच जनतेच्या न्याय्य हक्काच्या लढ्यात आपण कायम त्यांच्या पाठीशी उभे राहणार असल्याची ग्वाहीही त्यांनी दिली.

आंदोलनकर्त्यांनी यावेळी रिसोडच्या तहसीलदार मॅडम यांनी स्वतः उपोषणस्थळी येऊन नागरिकांच्या भावना, अडचणी व मागण्या प्रत्यक्ष ऐकून घ्याव्यात, अशी मागणी केली. केवळ आश्वासनांवर वेळ न घालवता प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली.दरम्यान, केनवडसाठी मंजूर झालेले अपर तहसील कार्यालय केनवड येथेच सुरू करण्याचा स्पष्ट निर्णय होत नाही, तोपर्यंत साखळी उपोषण सुरूच राहील, असा निर्धार आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केला. माजी आमदार विजयराव जाधव यांच्या भेटीमुळे आंदोलनाला व्यापक लोकसमर्थन मिळत असून, केनवडच्या न्याय्य हक्कासाठीचा संघर्ष आता निर्णायक टप्प्यावर पोहोचल्याची चर्चा परिसरात सुरू आहे.

# शेतकरी पुत्र विनायक पाटील यांची इंडो कॉटन डेव्हलपमेंट असोसिएशनच्या( ICDA ) च्या संचालकपदी नियुक्ती

**दैनिक युवक आधार**

**तालूका प्रतिनिधी :महादेव उप्पे** : देगलूर(दि.०५) देगलूर तालुक्यातील मौजे खुतमापूर येथील शेतकरी पुत्र विनायक विद्यासागर पाटील यांची इंडो कॉटन डेव्हलपमेंट असोसिएशन,(Indo Cotton Development Association– ICDA) च्या संचालक (Director) पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.

"इंडो कॉटन डेव्हलपमेंट असोसिएशन (ICDA) हा जागतिक बँकेच्या आर्थिक सहाय्याने (World Bank Funded) आणि महाराष्ट्र शासनाच्या सहयोगाने/सहाय्याने (Government of Maharashtra Assisted) शाश्वत कापूस परिसंस्था विकसित करण्यासाठी राबविण्यात येणारा उपक्रम आहे.ग्रामीण भागातील एका शेतकरी कुटुंबातून पुढे येत त्यांनी शाश्वत शेती,मृदा आरोग्य संवर्धन,नैसर्गिक शेती,बायोचार



तंत्रज्ञान आणि शेतकरी सक्षमीकरणाच्या क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची ही दखल मानली जात आहे.

ICDA च्या माध्यमातून महाराष्ट्रामध्ये शाश्वत कापूस परिसंस्था (Sustainable Cotton Ecosystem) विकसित करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.या उपक्रमाचा मुख्य उद्देश लघु व अल्पभूधारक कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे,उत्पादन खर्च कमी करणे,मातीचे आरोग्य सुधारणे आणि पर्यावरणपूरक कापूस शेतीला प्रोत्साहन देणे हा आहे.

या उपक्रमांतर्गत HDPS (High Density Planting System),Conservation System (CS),मृदा आरोग्य व्यवस्थापन,जलसंवर्धन,बायोचारचा वापर,कृषी अवशेषांचे मूल्यवर्धन (Waste to Wealth),हवामान-स्मार्ट शेती,शेतकरी प्रशिक्षण, डिजिटल कृषी आणि आधुनिक कापूस उत्पादन तंत्रज्ञानाचा प्रसार यावर विशेष भर दिला जाणार आहे. विनायक पाटील यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपन्या (FPO),कृषी विभाग, संशोधन संस्था,कृषी विद्यापीठे,स्वयंसेवी संस्था आणि विविध भागधारक यांच्या समन्वयातून महाराष्ट्रात सक्षम,स्पर्धात्मक आणि शाश्वत कापूस मूल्यसाखळी उभारण्याचे प्रयत्न केले जातील. विनायक पाटील यांनी यापूर्वीही शेतकरी जनजागृती,नैसर्गिक शेती,बायोचारद्वारे मृदा पुनरुज्जीवन,हवामान बदलास अनुकूल शेती,तसेच ग्रामीण विकास या क्षेत्रात विविध उपक्रम यशस्वीपणे राबविले आहेत.त्यांच्या प्रत्यक्ष शेतकरी संपर्काचा आणि तांत्रिक अनुभवाचा लाभ राज्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना मिळणार आहे.ही नियुक्ती खुतमापूर गाव, नांदेड जिल्हा आणि संपूर्ण मराठवाड्यासाठी अभिमानाची बाब असून,ग्रामीण भागातील एका शेतकरी पुत्राने राज्यस्तरावर महत्त्वपूर्ण जबाबदारी स्वीकारून शाश्वत कृषी विकासासाठी योगदान देण्याची ही प्रेरणादायी घटना आहे. "समृद्ध शेतकरी–निरोगी माती–शाश्वत कापूस–सक्षम महाराष्ट्र" हे ध्येय समोर ठेवून विनायक पाटील यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात शाश्वत कापूस उत्पादन,पर्यावरण संरक्षण आणि शेतकरी कल्याणासाठी प्रभावी कार्य करण्याचा संकल्प करण्यात आला आहे.

# पवारवाडीत ग्रामपंचायत कार्यालयासमोरील धोकादायक विहिरीवर सुरक्षा भिंत उभारण्याची मागणी; प्रहार संघटनेचे निवेदन"

**दैनिक युवक आधार**

**सणसर :- विकास क्षत्रिय** : दि. ४ पवारवाडी ग्रामपंचायत कार्यालय,प्राथमिक शाळा व अंगणवाडीकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यालगत असलेली धोकादायक विहीर नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण करत असल्याने या विहिरीभोवती तातडीने सुरक्षा भिंत अथवा तार कंपाऊंड उभारण्यात यावे,अशी मागणी प्रहार दिव्यांग क्रांती आंदोलन महाराष्ट्रच्या वतीने ग्रामपंचायतीकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, संबंधित रस्त्यावरून दररोज शाळकरी मुले,अंगणवाडीतील बालके, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच ग्रामस्थांची मोठ्या प्रमाणावर ये-जा सुरू असते. विहीर रस्त्याच्या अगदी कडेला असल्याने कोणत्याही क्षणी गंभीर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.त्यामुळे संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी ग्रामपंचायतीने तातडीने सुरक्षा उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली.



यावेळी प्रहार दिव्यांग क्रांती संस्थेचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष सुभाष इंगोले, पुणे जिल्हा सचिव रामदास चव्हाण यांनी ग्रामविकास अधिकारी आटोळे मॅडम यांना निवेदन सादर केले.यावेळी ग्रामपंचायत सदस्य सचिन कनेरकर, दादासो चव्हाण, प्राथमिक शाळा अध्यक्ष भाऊसो पवार, दादासो भोसले, सुरेश थोरात, अक्षय दळवी, किशोर थोरात, किशोर शिंदे, माजी सोसायटी चेअरमन राजेंद्र पवार,जितेंद्र पवार, अशोक जाधव, प्रहार संघटनेचे शाखाध्यक्ष मोरे तात्या, शाखा सचिव हरिदास करकरे यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.ग्रामस्थांनी प्रशासनाला इशारा देत सांगितले की,कोणतीही दुर्घटना घडण्यापूर्वीच विहिरीभोवती संरक्षण भिंत अथवा कंपाऊंड उभारण्यात यावे. अन्यथा भविष्यात अपघात झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित प्रशासनावर राहील.

# महागाव बसस्थानकातून एस.टी. बस सुरू करण्यासाठी पालकमंत्री संजय राठोड यांना निवेदन

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे महागाव (यवतमाळ)** : महागाव तालुक्यातील नागरिकांच्या सोयीसाठी शिवसेना तालुकाप्रमुख राजू राठोड यांनी यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री तथा मृदा व जलसंधारण मंत्री नामदार संजय भाऊ राठोड साहेब यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. माहूर आगार (जि. नांदेड) येथून छत्रपती संभाजीनगरकडे जाणारी खडका–पुसद मार्गावरील एस.टी. बस महागाव बसस्थानकातून चालविण्यात यावी, अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली.

या मागणीची गंभीर दखल घेत पालकमंत्री संजय भाऊ राठोड साहेब यांनी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या संबंधित अधिकाऱ्यांना योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. या संदर्भात संबंधित विभागाकडे पत्रव्यवहारही करण्यात आला आहे.

ही बस महागाव बसस्थानकातून सुरू झाल्यास महागाव तालुक्यातील सुमारे १२० गावांतील नागरिकांना मोठा फायदा होणार असून विद्यार्थी, शेतकरी, व्यापारी, नोकरदार व सर्वसामान्य प्रवाशांची प्रवासाची गैरसोय दूर होणार आहे.

यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख राजू राठोड यांनी महागाव तालुक्यातील जनतेच्या वतीने ही मागणी लवकरात लवकर मंजूर करून बससेवा सुरू करावी, अशी विनंती पालकमंत्री नामदार संजय भाऊ राठोड साहेब यांच्याकडे केली. या मागणीला सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याने महागाव तालुक्यातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# आचार्य बाळकृष्ण यांच्या प्रगटदिनानिमित्त लिहाखेडीत वृक्षारोपण

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी छत्रपती संभाजीनगर** : पर्यावरण संवर्धन व हरित ग्राम संकल्पनेला चालना देण्यासाठी सिल्लोड तालुक्यातील लिहाखेडी येथे मंगळवारी (दि. ४) सकाळी ८:३० वाजता वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. 'वृक्षवल्ली टीम सिल्लोड'च्या विशेष सहकार्याने आचार्य बाळकृष्ण यांच्या प्रगटदिनानिमित्त या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

लिहाखेडी येथील 'वैकुंठ धाम' (स्मशानभूमी) लगत सिल्लोड–जळगाव महामार्गाच्या परिसरात विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात




आली. वाढते तापमान, पर्यावरणातील बदल आणि वृक्षतोड यामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांवर मात करण्यासाठी वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन ही काळाची गरज असल्याचे यावेळी उपस्थितांनी सांगितले. वृक्षवल्ली टीमच्या या स्तुत्य उपक्रमाचे ग्रामस्थांनी विशेष कौतुक केले.

कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. शेखर दौड उपस्थित होते. त्यांच्या हस्ते वृक्षारोपण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवर व ग्रामस्थांनी वृक्षारोपणात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. केवळ वृक्ष लागवड करून न थांबता, लावलेल्या रोपांची नियमित देखभाल करून ती जगविण्याची जबाबदारी प्रत्येकाने स्वीकारावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले. वृक्षांमुळे पर्यावरणाचा समतोल राखला जात असून भावी पिढीला स्वच्छ व निरोगी वातावरण मिळण्यासाठी प्रत्येकाने वृक्षसंवर्धनाची चळवळ अधिक व्यापक करावी, असा सूर मान्यवरांच्या मनोगतातून उमटला. या उपक्रमामुळे स्मशानभूमीलगतचा परिसर भविष्यात हिरवागार होण्यास मदत होणार असून पर्यावरण रक्षणाचा संदेशही समाजापर्यंत पोहोचणार आहे. कार्यक्रमाला गावकऱ्यांचा मोठ्या प्रमाणावर उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

यावेळी प्रा. शिवराम साखळे, सरपंच नामदेव साखळे, दिलीप साखळे, हरिदास साखळे, पत्रकार गजानन वाघ, राजू डापके, गणेश बावस्कर, समाधान भाले, विष्णू फरकाडे, रामनदास साखळे, चंद्रभान साखळे, विशाल साखळे, ज्ञानेश्वर गोरे, अभिषेक साखळे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाची प्रेरणादायी गाथा: विदर्भाच्या लेख सौ. कांचन रायपूरे पुण्यात ठरल्या 'आंतरराष्ट्रीय ELITE' स्पर्धेच्या 'प्रथम उपविजेता'!

**दैनिक युवक आधार**

**आर्णी तालुका प्रतिनिधी - मुरली राठोड** : कोणत्याही क्षेत्रात यशाची शिखरे सर करण्यासाठी जिद्द, चिकाटी आणि प्रचंड आत्मविश्वास असेल, तर स्वप्ने नक्कीच सत्यात उतरतात. याचे उत्तम उदाहरण विदर्भाच्या मातीतून पुढे आलेल्या आणि सध्या पुण्यात स्थायिक असलेल्या सौ. कांचन रायपूरे यांनी करून दाखवले आहे. नुकत्याच पार पडलेल्या 'आंतरराष्ट्रीय ELITE' सौंदर्य व कौशल्य स्पर्धेत त्यांनी 'प्रथम उपविजेता' (First Runner-up) हा मान मिळवत विदर्भासह संपूर्ण महाराष्ट्राची मान अभिमानाने उंचावली आहे.



**शिक्षण आणि जडणघडण**

सौ. कांचन रायपूरे यांचे मूळ शिक्षण अकोला जिल्ह्यातील मूर्तिजापूर येथे झाले आहे. मूर्तिजापूरसारख्या मध्यमवर्गीय आणि सांस्कृतिक वारसा लाभलेल्या शहरात त्यांचे शालेय व महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण झाले. लहानपणापासूनच प्रत्येक गोष्टीत अग्रेसर राहण्याची त्यांची वृत्ती होती. संकटांवर मात करत आणि कुटुंबाची साथ लाभत त्यांनी आपल्या उच्च शिक्षणाची आणि स्वप्नांची पायाभरणी केली.

**पुण्यात गाजवला दबदबा**

शिक्षण पूर्ण झाल्यानंतर पुण्यासारख्या उच्च व प्रगतशील शहरात त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली. कौटुंबिक जबाबदाऱ्या सांभाळत असतानाच त्यांनी स्वतःमधील कलागुणांना आणि महत्त्वाकांक्षांना कधीही मसूद होऊ दिले नाही. 'आंतरराष्ट्रीय ELITE' सारख्या मानाच्या स्पर्धेत देश-विदेशातून आलेल्या उच्च-गुणवत्तेच्या स्पर्धकांशी मुकाबला करत सौ. कांचन यांनी आपल्या सौंदर्याची, बुद्धिमत्तेची आणि आत्मविश्वासाची चुणूक दाखवली.

**तरुणाईसाठी ठरल्या प्रेरणास्थान**

सौ. कांचन रायपूरे यांच्या या यशामुळे मूर्तिजापूर आणि विदर्भात आनंदाचे वातावरण पसरले आहे. मूर्तिजापूरची एक सामान्य लेक आंतरराष्ट्रीय पातळीवर चमकू शकते, हा संदेश त्यांनी आजच्या तरुण पिढीला दिला आहे. त्यांच्या या यशामध्ये त्यांच्या कठोर परिश्रमाचा आणि अफाट आत्मविश्वासाचा मोठा वाटा आहे.या यशाबद्दल सौ. कांचन रायपूरे यांचे सर्वत्र कौतुक होत असून, विविध क्षेत्रांमधून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# उत्कृष्ट पोलीस पाटील पुरस्कारप्राप्त रामचंद्र पारवे यांचा हातनूर येथे सत्कार

**दैनिक युवक आधार**

**सेलू | प्रतिनिधी शिवाजी पवार** : महसूल दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी येथे जिल्ह्यातील उत्कृष्ट पोलीस पाटील म्हणून निवड झाल्याबद्दल हातनूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पोलीस पाटील रामचंद्र पारवे यांचा सर्व शिक्षकवृंद व ग्रामस्थांच्या वतीने शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी श्री नागनाथ भगवान मंदिर समितीचे अध्यक्ष बाबासाहेब आंधळे, माजी सरपंच आसारामजी काकडे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष मोतीरामजी रोकडे, उपाध्यक्ष संपतराव काकडे, माजी सैनिक कॅप्टन रमेशराव काकडे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अमोल सहजराव, उपाध्यक्ष जगन्नाथ सज्जन, संपत सज्जन, सुभाष गाडे, सचिन रोकडे, नारायण निर्वळ, शिवाजी राऊत, बाबा आबुज, शाळेचे



मुख्याध्यापक संजय राठोड, कृष्णा पुरनाळे, सौ. सुनिता बोंडफळे, भारत गोल्हारे, शिवाजी लघुळे, गजानन फुटाणे, कैलास चिंचाने, सौ. वर्षा मुरकेवार यांच्यासह शिक्षकवृंद, विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात कॅप्टन रमेशराव काकडे यांनी रामचंद्र पारवे यांच्या कर्तव्यदक्ष व लोकाभिमुख कार्याचा गौरव केला. मुख्याध्यापक संजय राठोड यांनी शाळेच्या विविध उपक्रमांमध्ये तसेच SIR मोहिमेत पोलीस पाटील यांनी दिलेल्या मोलाच्या सहकार्याचा विशेष उल्लेख केला. त्यांच्या सक्रिय सहभागामुळे हातनूर गावात SIR मोहिमेचे १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण झाल्याचे त्यांनी सांगितले.

आभार प्रदर्शन कैलास चिंचाने यांनी केले. सत्काराला उत्तर देताना रामचंद्र पारवे म्हणाले, "हा पुरस्कार केवळ माझा नसून श्री नागनाथ भगवान यांच्या कृपेने आणि गावकऱ्यांच्या आशीर्वादाने मला मिळाला आहे. त्यामुळे हा सन्मान मी हातनूरच्या सर्व ग्रामस्थांना समर्पित करतो. माझ्यावर प्रेम व्यक्त करून सत्कार केल्याबद्दल सर्व शिक्षकवृंद आणि ग्रामस्थांचे मी मनःपूर्वक आभार मानतो."


कार्यक्रमात उपस्थितांनीही रामचंद्र पारवे यांनी गावाच्या विकासासाठी, सामाजिक सलोखा राखण्यासाठी आणि लोकहिताच्या विविध उपक्रमांत दिलेल्या योगदानाचे कौतुक करून त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# लखनसिंह ठाकूर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश

**पळसखेड लघु पाटबंधारे योजनेच्या ४५७.५२ लाखांच्या अतिरिक्त दायित्व मंजुरीचा प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी सादर**

**दैनिक युवक आधार रिसोड प्रतिनिधी. रणजितसिह. ठाकूर रिसोड, दि. ३ :** भारतीय जनता पक्षाचे उत्तर भारतीय महाराष्ट्र प्रदेश सचिव लखनसिंह ठाकूर यांनी पळसखेड लघु पाटबंधारे योजना, ता. रिसोड, जि. वाशिम या प्रकल्पासंदर्भात सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला यश मिळाले असून, लघु पाटबंधारे विभाग, वाशिम (बांधकाम) यांनी याबाबत अधिकृत पत्र जारी केले आहे.

कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, वाशिम यांनी दिलेल्या पत्रानुसार, रु. ४५७.५२ लाखांच्या अतिरिक्त दायित्व मंजुरीसाठी आवश्यक प्रस्ताव प्रादेशिक कार्यालयाच्या शिफारशीनुसार महामंडळ कार्यालयाकडे



पुढील मंजुरीसाठी सादर करण्यात आला आहे. या प्रस्तावामध्ये मुख्य धरण भिंतीचे भराव काम, सांडवा व इतर संबंधित बांधकामांचा समावेश आहे.

या संदर्भात लखनसिंह ठाकूर यांनी संबंधित विभाग, प्रादेशिक कार्यालय तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सातत्याने पाठपुरावा करून हा विषय मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या पाठपुराव्यामुळे आता प्रस्ताव पुढील प्रशासकीय प्रक्रियेसाठी पाठविण्यात आला असून, अंतिम मंजुरीनंतर प्रकल्पाच्या कामांना गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

यावेळी लखनसिंह ठाकूर यांनी सांगितले की, "शेतकरी व सर्वसामान्य जनतेच्या हिताचे विकासकामे पूर्ण व्हावीत, यासाठी माझा सातत्याने पाठपुरावा सुरू राहील. विकासाच्या प्रत्येक प्रश्नासाठी मी नेहमीच कटिबद्ध आहे."

# आदिवासी समाजाच्या १२,५०० रखडलेल्या आरक्षित पदांची भरती तात्काळ करा; अन्यथा तीव्र आंदोलन करू– अॅड. अजय ढंगारे

**दैनिक युवक आधार उमरखेड तालुका प्रतिनिधी राजू गायकवाड :** यवतमाळ | दि. ३ ऑगस्ट २०२६ आदिवासी समाजाच्या रखडलेल्या सुमारे १२,५०० आरक्षित पदांची भरती तात्काळ पूर्ण करण्यात यावी, या मागणीसाठी आज अॅड. अजय दत्ता ढंगारे यांच्या नेतृत्वात जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्यामार्फत मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना निवेदन सादर करण्यात आले.निवेदनात नमूद करण्यात आले की, अनुसूचित जमाती समाजासाठी आरक्षित पदे अनेक वर्षांपासून रिक्त असून त्यामुळे हजारो पात्र आदिवासी युवक-युवती रोजगारापासून वंचित आहेत. शासनाने तातडीने विशेष भरती मोहीम राबवून सर्व रिक्त पदे भरावीत, भरतीचे निश्चित वेळापत्रक जाहीर करावे आणि या प्रश्नावर उच्चस्तरीय बैठक घेऊन सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली.



यावेळी प्रकाश शेळकर, अनिकेत मोहकर, गणेश मोहकर, देवानंद मडावी, दीपक पार्चाके, विकी गेडाम, अक्षय आत्राम तसेच इतर आदिवासी विद्यार्थी व युवक उपस्थित होते.शासनाने या न्याय्य मागण्यांकडे तात्काळ लक्ष देऊन रखडलेली भरती पूर्ण करावी, अन्यथा आदिवासी समाजाच्या वतीने लोकशाही मार्गाने राज्यव्यापी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा अॅड. अजय दत्ता ढंगारे यांनी यावेळी दिला.आदिवासी समाजाच्या १२,५०० रखडलेल्या आरक्षित पदांची भरती तात्काळ करा; अन्यथा तीव्र आंदोलन .अॅड. अजय दत्ता ढंगारे यवतमाळ | दि. ३ ऑगस्ट २०२६आदिवासी समाजाच्या रखडलेल्या सुमारे १२,५०० आरक्षित पदांची भरती तात्काळ पूर्ण करण्यात यावी, या मागणीसाठी आज अॅड. अजय दत्ता ढंगारे यांच्या नेतृत्वात जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्यामार्फत मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना निवेदन सादर करण्यात आले.निवेदनात नमूद करण्यात आले की, अनुसूचित जमाती समाजासाठी आरक्षित पदे अनेक वर्षांपासून रिक्त असून त्यामुळे हजारो पात्र आदिवासी युवक-युवती रोजगारापासून वंचित आहेत. शासनाने तातडीने विशेष भरती मोहीम राबवून सर्व रिक्त पदे भरावीत, भरतीचे निश्चित वेळापत्रक जाहीर करावे आणि या प्रश्नावर उच्चस्तरीय बैठक घेऊन सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी प्रकाश शेळकर, अनिकेत मोहकर, गणेश मोहकर, देवानंद मडावी, दीपक पार्चाके, विकी गेडाम, अक्षय आत्राम तसेच इतर आदिवासी विद्यार्थी व युवक उपस्थित होते.

शासनाने या न्याय्य मागण्यांकडे तात्काळ लक्ष देऊन रखडलेली भरती पूर्ण करावी, अन्यथा आदिवासी समाजाच्या वतीने लोकशाही मार्गाने राज्यव्यापी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा अॅड. अजय दत्ता ढंगारे यांनी यावेळी दिला.

# एकच लक्ष, प्रत्येक शाळेत राज्य पुष्प वृक्ष

**दैनिक युवक आधार योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी छत्रपती संभाजीनगर**

महाराष्ट्र राज्याचे राज्य पुष्प व हरित मानचिन्ह असलेल्या 'जारूळ (ताम्हण)' या वृक्षाच्या प्रसार व संवर्धनासाठी सिल्लोड येथील 'अभिनव प्रतिष्ठान'चे उपाध्यक्ष डॉ. संतोष पाटील यांनी हाती घेतलेला "एकच लक्ष, प्रत्येक शाळेत राज्य पुष्प वृक्ष" हा उपक्रम सध्या संपूर्ण जिल्ह्यात कौतुकाचा विषय ठरत आहे. या मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील शाळांच्या परिसरात जारूळ-ताम्हण वृक्षाची रोपे मोठ्या उत्साहात लावली जात आहेत.

विशेष म्हणजे, गेल्या पाच वर्षांपासून डॉ. संतोष पाटील हे या उपक्रमाद्वारे राज्यभर पर्यावरण जागृतीचे कार्य करत आहेत. त्यांनी या वृक्षाची सविस्तर माहिती व त्याचे महत्त्व विशद करणारे 'क्यू आर कोड' (QR Code) विकसित केले आहेत. वृक्षारोपण केलेल्या ठिकाणी हे क्यू आर स्टीकर



लावले जात असून, मोबाईलवर हा कोड स्कॅन केल्याबरोबर झाडाची संपूर्ण माहिती क्षणात उपलब्ध होते. या आधुनिक तंत्रज्ञानामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयीची गोडी आणि तांत्रिक जिज्ञासा अधिक वाढीस लागत आहे.

**१८ शाळांमध्ये वृक्षारोपण व विशेष लेखाचे वाचन**

या वृक्षरोपण अभियानांतर्गत २०२६ या वर्षात सिल्लोड, फुलंब्री, कन्नड व सोयगाव तालुक्यातील १८ शाळांमध्ये राज्य पुष्प वृक्षाचे रोपण करण्यात आले. यात गायरानवाडी, प्रतापवाडी, शिवेश्वर वाडी, मल्हारवाडी, (पीएमश्री) केंद्र शाळा केऱ्हाळा, पाडळी, वाडी मोहनदरी, सराटी, सिल्लोड, चिंचोली वाडी, कानोबावाडी आदी शाळांचा समावेश आहे. तसेच 'स भु पत्रिका' या विशेषांकात प्रसिद्ध झालेल्या डॉ. संतोष पाटील यांच्या "आपले राज्य पुष्प जारूळ" या विशेष लेखाचे वाचनही शाळांमध्ये घेण्यात आले, ज्यातून विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन मिळाले.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात सर्वदूर राबवल्या जाणाऱ्या या अभिनव उपक्रमामुळे हा जिल्हा राज्यातील असा नाविन्यपूर्ण उपक्रम राबवणारा पहिला व एकमेव जिल्हा ठरत आहे.

- छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात अनोखा उपक्रम
- जिल्ह्यातील प्रत्येक शाळेत फुलणार महाराष्ट्र राज्याचे राज्य पुष्प 'जारूळ (ताम्हण)'

**शिक्षकांचे लाभले अमूल्य सहकार्य**

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी धीरज राजपूत, प्रदीप बिडकर, समता कडू, सरस्वती पालोदकर, मोहिनी दुरोळे, संजय बागुल, संदीप ढेपले, राहुल पवार, मुख्याध्यापक रामचंद्र मोरे, दत्तात्रय चव्हाण, चोरमले, सूर्यवंशी आदींसह विविध जिल्हा परिषद प्रशालांच्या शिक्षकांनी सक्रिय सहभाग नोंदवला असून, लावलेल्या प्रत्येक रोपाचे संगोपन करण्याची नैतिक जबाबदारीही त्यांनी स्वीकारली आहे.

# बोगस डॉक्टर ठरवून कारवाईची धमकी; बोर्ली पंचतन आरोग्य केंद्रातील आरोग्य सहाय्यक ५ हजारांची लाच घेताना जाळयात

**दैनिक युवक आधार श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी- अनिकेत मोहित :** बोगस डॉक्टर असल्याचे सांगून कारवाईची धमकी देत तक्रारदाराकडून ५ हजार रुपयांची लाच स्वीकारणाऱ्या बोर्ली पंचतन येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य सहाय्यकाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (ACB) रंगेहाथ पकडले. घनश्याम बेलाजी कोमटवार (वय २२, वर्ग-३ कर्मचारी) असे अटक करण्यात आलेल्या लोकसेवकाचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपीने तक्रारदाराला "तुम्ही बोगस डॉक्टर आहात, तुमच्यावर रेड टाकून कारवाई करेन" अशी धमकी देत १० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. याबाबत तक्रारदाराने रायगड ACB युनिटकडे तक्रार दाखल केली.

सोमवार, ३ ऑगस्ट २०२६ रोजी पंचांसमक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी करण्यात



आली. त्यानंतर तडजोडीनंतर आरोपीने ५ हजार रुपये स्वीकारण्यास होकार दिला. प्राथमिक आरोग्य केंद्रात गर्दी असल्याने त्याने तक्रारदाराला बाहेर बोलावले.

दुपारी सुमारे ३.५५ ते ४.१५ वाजण्याच्या दरम्यान, बोर्ली पंचतन प्राथमिक आरोग्य केंद्राबाहेरील रस्त्यावर तक्रारदाराकडून ५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना ACB च्या पथकाने आरोपीला रंगेहाथ पकडले.

तपासादरम्यान आरोपीच्या हातावर तसेच जीन्स पॅन्टच्या खिशावर अँथ्रासिन पावडर आढळून आली.

या प्रकरणी भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये (PC Act कलम ७) गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती ACB कडून देण्यात आली.

**कारवाई करणारे पथक**

ही कारवाई ठाणे परिक्षेत्राचे पोलीस अधीक्षक शिवराज पाटील, अप्पर पोलीस अधीक्षक भागवत सोनवणे आणि सुहास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

रायगड युनिटच्या पोलीस उपअधीक्षक सरिता आय. एस. भोसले यांच्या नेतृत्वाखाली पोलीस निरीक्षक अरुण करकरे, पोलीस हवालदार महेश पाटील आणि नवदित नांदगावकर यांनी सापळा यशस्वी केला.

**नागरिकांना ACB चे आवाहन**

कोणताही शासकीय अधिकारी किंवा कर्मचारी कामासाठी लाचेची मागणी करत असल्यास नागरिकांनी तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या टोल-फ्री क्रमांक १०६४ वर संपर्क साधावा, असे आवाहन विभागाने केले आहे.

# डॉ. विष्णू उकंडे यांच्या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद; वाढदिवसाचा खर्च वळवला पूरग्रस्तांच्या मदतीसाठी

**दैनिक युवक आधार दिग्रस तालुका प्रतिनिधी उमेश साखरकर :** समाजाप्रती असलेली बांधिलकी जपत वाढदिवसाचा जल्लोष टाळून पूरग्रस्तांच्या मदतीसाठी पुढाकार घेण्याचे आवाहन करणारे प्रेरणा संस्थेचे अध्यक्ष तथा शिवसेना उपजिल्हाप्रमुख डॉ. विष्णू उकंडे यांच्या सामाजिक उपक्रमाला नागरिक, मित्रपरिवार आणि शिवसैनिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. वाढदिवसानिमित्त हार, पुष्पगुच्छ, केक, बॅनर व पोस्टर यावर होणारा खर्च टाळून तो पूरग्रस्तांच्या मदतीसाठी वापरण्याचा संदेश त्यांनी दिला आणि त्यातून माणुसकीचे दर्शन घडले.

३ ऑगस्ट रोजी डॉ. उकंडे यांचा वाढदिवस होता. मात्र, त्यांचे जिवलग मित्र अविनाश खंदारे यांच्या पत्नी व दोन मुलींचा पुराच्या पाण्यात वाहून जाऊन दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली. या हृदयद्रावक घटनेने संपूर्ण परिसर शोकाकुल झाला. त्याचबरोबर अतिवृष्टी



आणि पुरामुळे अनेक कुटुंबांची घरे, शेती व संसार उद्ध्वस्त झाल्याने अनेकजण संकटात सापडले आहेत. या पार्श्वभूमीवर वाढदिवस साजरा करणे उचित नसल्याचे सांगत डॉ. विष्णू उकंडे यांनी कोणताही जल्लोष न करता पूरग्रस्तांच्या मदतीसाठी सर्वांनी पुढे यावे, असे आवाहन केले.

या आवाहनाला प्रेरणा संस्था, शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्ते, मित्रमंडळी व शुभचिंतकांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. त्यांच्या संयुक्त विद्यमाने पूरग्रस्त कुटुंबांना जीवनावश्यक वस्तूंचे किराणा किट वितरित करण्यात आले.

तसेच पूरपरिस्थितीमुळे शैक्षणिक साहित्याचे नुकसान झालेल्या विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके व इतर शालेय साहित्य देऊन त्यांच्या शिक्षणाला हातभार लावण्यात आला. पूरामुळे संसार उद्ध्वस्त झालेल्या कुटुंबांच्या दुःखात सहभागी होत त्यांना धीर देण्याबरोबरच आवश्यक मदतीचा हात पुढे करण्यात आला. वाढदिवसाच्या निमित्ताने अनावश्यक खर्च टाळून गरजूंना मदत करण्याचा संदेश समाजापर्यंत पोहोचला. या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत असून, सामाजिक जाणिवेतून साजरा झालेला हा वाढदिवस अनेकांसाठी प्रेरणादायी ठरला आहे.

यावेळी राजेंद्र जाधव, फारूक धारीवाला, सुरेश पवार, आर्णीचे उपनगराध्यक्ष निलेश गावंडे, अश्विन जाधव, नगरसेवक पवन चाफले, नुरुल्ला खान, दिलीप नागापुरे, अभिलाष इंगोले, उपशहर प्रमुख मनोज चारोळे, युवा सेना तालुका प्रमुख गौरव बोरकर, इम्रान खान, राजाराम राठोड, विलास आडे, दादाराव नांदे, दिनेश राठोड, जीवन राठोड, राजेश आडे, इम्रान बेग, नौशाद सर, पत्रकार महेश गाढवे, सुनील पवार, शिवसेना महिला तालुका प्रमुख अश्विनी देशमुख, शहर प्रमुख संध्या मुनेश्वर, आर्णी नगरपरिषदेच्या सभापती छबूताई चारोडे, कविता चव्हाण, चंदा आत्राम, शालिनी सोयाम तसेच अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

# येवदा येथे माकडांचा हैदोस; वन विभागाची मोठी कारवाई, ८३ माकडांना पकडले

**दैनिक युवक आधार ज्ञानेश्वर काळे :** दर्यापूर तालुक्यातील येवदा गावात गेल्या काही दिवसांपासून माकडांच्या वाढत्या उपद्रवामुळे ग्रामस्थ त्रस्त झाले होते. नागरिकांच्या तक्रारींची दखल घेत वन विभागाने विशेष मोहीम राबवत एकूण ८३ माकडांना सुरक्षितरीत्या पकडून त्यांच्या नैसर्गिक अधिवासात स्थलांतरित केले.

शिवसेना (शिंदे गट) चे प्रदीप वडतकर यांनी अमरावती वन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर ही मोहीम हाती घेण्यात आली.

वन विभागाच्या पथकाने बसस्थानक परिसर, शास्त्री नगर व आंबेडकर नगर या भागांत विशेष कारवाई करत माकडांना जेरबंद केले.

कारवाईनंतर पकडलेल्या सर्व माकडांना सुरक्षितपणे त्यांच्या नैसर्गिक अधिवासात



सोडण्यात आले.

या मोहिमेत वन विभागाचे संजय इंगोले, समाधान गिरी, जयप्रकाश धनदर, खंडारे तसेच इतर कर्मचाऱ्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

दरम्यान, गावात अद्याप काही माकडे शिल्लक असल्याने त्यांना पकडण्यासाठी वन विभागाची मोहीम मंगळवार, ४ ऑगस्ट रोजी सकाळी ६ वाजल्यापासून पुन्हा सुरू करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. गावातील नागरिकांना त्यांच्या परिसरात माकडे दिसल्यास तातडीने वन विभागाशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज पार्क परिसरात माकडांचा कळप

**दैनिक युवक आधार प्रतिनिधी:-मयुर धुरी (दादर ,मुंबई) :** बालमोहन शाळेजवळ आज माकडांचा कळप आढळून आल्याने परिसरात काही काळ नागरिकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आणि भीतीही प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, अनेक माकडे एकत्र फिरताना दिसली.सुदैवाने या घटनेत कोणालाही कोणतीही इजा झाली नाही. माकडांनी कोणावरही हल्ला केला नसून काही वेळ परिसरात वावरल्यानंतर ते तेथून निघून गेल्याचे स्थानिकांनी सांगितले.नागरिकांनी मात्र अशा वन्य प्राण्यांच्या जवळ जाणे, त्यांना खाद्य देणे किंवा छेडण्याचा प्रयत्न करू नये, तसेच आवश्यक असल्यास संबंधित प्रशासन किंवा वन विभागाला माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे. बालमोहन विद्यालय हे शिवाजी पार्क, दादर परिसरातील एक प्रसिद्ध शैक्षणिक संस्थान आहे.

